विषय काव्य
सं. नं. २०३४.

# काव्यकुसुमोद्यान.

## गुच्छ तिसरा

लेखक व प्रकाशक—विश्वनाथ नारायण वाड,
रविवार पेठ, घ. नं. ८१३, नाशिक.

मुद्रक—अच्युत चिंतामण भट, 'यशवंत'
छापखाना, कसबा पेठ, पुणें.

REFBK-0001697
REFBK-0001697

९१९.

किंमत २ आणे.

# काव्यकुसुमोद्यान.

१६८७.

## गुच्छ तिसरा

लेखक व प्रकाशक — विश्वनाथ नारायण वाड,
रविवार पेठ, घ. नं. ८१३, नाशिक.

मुद्रक—अच्युत चिंतामण भट, 'यशवंत'
छापखाना, कसबा पेठ, पुणें.

REFBK-0001697
REFBK-0001697

किंमत २ आणे.

ख्रिस्तलोकवासी रेव्हरंड

**नारायण वामन**

**टिळक**

यांच्या पवित्र स्मृतीस—

समर्पित असो.

# काव्यकुसुमोद्यान

## गुच्छ तिसरा.

### १ माझी संपदा

पद-( त्रिखंड हिंडुनि धुंडितसें० )

मम संपत्ती पहा जरा । टाकुनिया तुमचा तोरा ।
अक्षय राहे मजपाशीं । तुमची सोडिल तुम्हांसी ।
कविता धन हें ।
उत्तम आहे ।
भुलवि न मोहें ।
दुर्गुणगर्तेमाजि नरा । लोटिल न कधीं अवधारा ॥१॥
शील दुजी संपत् माझी । जीवरि दुनिया मज राजी ।
मणिरत्नांचीं मी ओझीं । लावुं वदा कवण्या काजीं? ।
कनक मेखला ।
भुळवि दृष्टिला ।
काविसि शृंखला ।
गमते जी । नको मला ते गज वाजी ॥ २ ॥

ग्रंथ संग्रहालय
ना. क्र. २६९९

तिसरें धन हें प्रभुनाम । दाविल सौख्याचें धाम ।
निष्ठेनें घे निष्काम । त्यास लाभतो विश्राम ।
इतर सुखांची ।
तया पुढेंचि ।
किंमत साची ।
व्हावी कुठुनी? सत्प्रेम । जगता जिंकिल, हा नियम ।

---

## २ सुशील भार्या

(साक्या)

सुशील भार्या पतिहितकार्यीं अक्षय राहे दक्ष ॥
तत्सुख केवल स्वसुख म्हणोनी वागे ईश्वरसाक्ष ॥ १ ॥
स्वार्थप्रीतीमूळ जियेच्या मनांत न दिसे जाणा ॥
स्त्रीजाती निर्मुनी नरांना करितो ईश शहाणा ॥ २ ॥
रोगग्रस्त पतीला पत्नी देवदूतिका गमते ॥
चित्तस्वास्थ्य मिळावें म्हणुनी परोपरीनें श्रमते ॥ ३ ॥
संकटसमयीं हितोपदेशा करुनी कांत-मनाला ॥
धीर देतसे सुशील भार्या, प्रभुसि करी नमनाला ॥ ४ ॥
सीतासावित्रीसम ललना गुणमंडित बहु पूर्वीं ॥
झाल्या; पुनरपि होतां गमते भूषित होइल उर्वी ॥ ५ ॥
संसाराचा शकट सुखानें चाले सतत जगांत ॥

काव्य नं.

चक्रासम नरनारी जेव्हां आत्मकार्य करितात ॥ ६ ॥
महती आहे जगीं जयाला सुशील आर्या मिळते ॥
भाग्यवान तो दिसे; तयाचें चरित्र न कधीं मळतें ॥७॥

---

## ३ प्रयत्नप्रभाव.

( आर्या )

वाल्या वाल्मिक कैसा झाला ती सांगतों तुम्हां गोष्ट ॥
पूर्व-श्रुत ती म्हणुनी न करा मत्काव्यसेवनीं कष्ट ॥ १॥
बहुधा जगांत दिसतें देखा कीं तेंच तें पुन्हा मनुजा ॥
नित्य नव्याऽनंदाला देतें, त्यांतील तत्व मनिं समजा २
वाल्या लुटालुटीनें वाटसरांना हरूनिया, वित्त ॥
मिळवी बहू; परंतू दयार्द्र दिसलें कधीं न ताच्चित्त ३ ॥
कार्यक्रम तो ऐसा बहुदिनपर्यंत चालला मात्र ॥
परि एक दिनीं झाला तो नारद-थोरसत्कृपा-पात्र ॥४॥
तो ऋषि निजआनंदीं लीन असुनि गायनांत घे ताना ॥
त्याला वाल्या रोधुनि दिसला विचार्थ शोध घेतांना ॥५
मुनि वदला "वा वाल्या, निष्कांचन पुरुष मी, मला काय।
लुटितोस? ऐकसी मद्वचना तरि हरिन आपुला काय"
तो चौर्यनिपुण वाल्या दुष्ट दुराधम जरी महा होता ॥
तरि त्या वाटे परिसिन, मजला मुनि सांगतील तें आतां.

बोले विचार करुनी सत्वर सांगा मुने, तुम्ही बोध ॥
" हितकर मार्गा वरुनी लावावा त्वां तयांत सुख-शोध॥
तूं काय खटाटोपें आरभिसी नीच कृत्य या जगतीं ॥
चौर्य महापातक हें करुनि दुराधम कशास ते जगती॥९॥
कालापव्यय करणें, अधमासम नीच कृत्य आचरणें ॥
हें काय योग्य तुजला ? यापेक्षां खचित योग्यतर मरणें ॥
क्षणभंगुर नरतनु ही, काय पुढें होय त्वद्गती बापा ?
ही सोड सकल रीती, नाम मुखानें वदोनि निष्पापा ॥
येथें जगांत वाल्या, मायामोहामुळें नरा गमतें ॥
'आप्तस्वकीय माझे,' परि अंतीं गोष्ट निष्फला ठरते ॥
जावत्काल नरानें द्रव्यार्जन करुनि सौख्य वितरावें ॥
तोंवर सकल तुझे रे, तें नसतां सर्व दाविती कावे ॥
कन्या पुत्र तशी तव पत्नी घ्यावी परीक्षुनी आज ॥
त्यांना विचारुनीया वृत्त घडे तें मला कथी सहज ॥
त्या सर्वांस म्हणावें 'मजकारितां सिद्ध कोण मरण्यास ?
प्रेम परीक्षावें,' ही माझ्या चित्तांत ठेविली आस ॥१५॥
ऐसें ऐकुनि वाल्या त्यास म्हणे, नारदा, न जावें कीं॥
तुम्हांसम ऋषिवर ते व्यवहारी केवि सोडितिल नेकीं ॥
मी येतों तोंवरि, हे भगवंता! थांबणें इथें ऐसें ॥
गृहिंचें वृत्त तुम्हांला कळविन जें जें घडेल तें तैसें ॥१७

सत्य तुला जरि समजे, तरि हें त्वां चौर्यकर्म सोडावें ॥
सुज्ञ नरानें लोकीं व्यर्थ दुजाला कशास नाडावें ॥१८॥
वाल्या घरांत जातां, पुत्रानें प्रश्न कुशल करुनीया ॥
विचारिलें 'प्रिय ताता! कां येणें आज शीघ्र या ठाया ॥
प्रियनाथाला कांता त्या समयीं हास्यमधु वचें बोले ॥
'कां आज शीघ्र येथें प्राणेश्वर! कार्य टाकुनी आले? ॥
चिंता बहु वाटतसे, कुशल कळावें अशी असे आस ॥
प्रियनाथा कां झाला अपुल्याला आज एवढा त्रास? ॥
यापरि त्या सर्वांनीं मायेचें जाल पसरुनी त्याला ॥
मोहित केलें, परि त्या निरोप ऋषिचा मनां मधें आला॥
"तूं भार्ये! मजसाठीं मरण्याला सिद्ध होसि कां सांग?
आयु तुझें मज देसी, तरि जगतों. कार्य जाणुनी वाग ॥
प्रियपुत्रा! स्नेहाळा! तातासाठीं मरावया आज ॥
हो सिद्ध, तरी जगतो पिता तुझा; जाण मानसीं काज ॥
प्रिय दुहिते, पितयाच्या प्राणाकरितां निजाहुती द्यावी ॥
त्रिखंड कीर्ति करोनी जावें तरी धन्यता जगीं यावी ॥२५
त्या सर्वांनीं कथिलें 'प्राण जगीं प्यार वाटतो हा हो ॥
सोडावा तो, ऐशी अपुली फलरहित गोष्ट ती राहो ॥२६
सुख द्यावें तुम्हांला हें अमुचें योग्य काम जरि राहे ॥
प्राणापेक्षां जगतीं प्रियतम कोणास कोण तें आहे?" ॥

परिसुनि वार्ता ऐशी वाल्या दुःखें बहुत होरपळे ॥
संसारासक्ती मग दृढ त्याच्या मानसामधोनि पळे ॥२८
विफल जिणें त्या वाटे पुत्रकलत्रादि व्यर्थसें गमलें ॥
वैराग्याग्नींत तदा शोधित होऊनि चित्त तें रमलें ॥ २९
व्यर्थ पसारा मांडुनि येथें नर प्रेम करितसे फार ॥
आप्तस्नेही सोडिति ऐशा जगता दुरोनी धिक्कार! ॥३०
राहो इतुकी वार्ता, तेव्हां तो नारदांकडे जाय ॥
म्लानवदन पाहुनि त्या, ओळखिलें, घास लागला घाय ॥
मुनि त्या वदे 'असों दे; दुःख नसावें; त्यजी सकल चिंता
कर्तव्य नरें करूनीं अर्पावें फल सुखेंचि भगवंता ॥३२
ऐशी ऐकुनि वाणी, वाल्याचें हृदय फारसें द्रवलें ॥
नवनीत वन्हिसान्निध नेतां राहील केवि तें पहिलें? ॥
तेव्हांपासुनि त्यानें रामजपाची धरोनिया कास ॥
आचरिलें तप दारुण, वाल्मिकि विख्यात होय लोकांस ॥
सज्जन रसिक तयांनीं अनुभव घ्यावा त्यजोनिया घाई ॥
यत्न जरी दृढ केला, नर नारायण जगांत हा होई ३५

---

## ४ काव्यकर्ता.

चाल — (लक्ष्मण पडला धरणीला.)

जगांत म्हणती कवि ज्यास ।
खरें विचारा हें त्यास ।
माझें माझें काव्य जरी ।
वाटतसे तुज हृदंतरीं ।
काव्याचें ह्या कार्य पहा ।
प्रतिभेवांचुनि व्यर्थ अहा ! ।
स्फूर्ती येते कोठोनी ? ।
कविराया तव शुद्ध मनीं ।
सांग देतसे, ती कोण ? ।
तोच तुझा स्वामी जाण ! ।
आज्ञेवांचुनि ज्याच्याही ।
पान जगीं हालत नाहीं ।
साळुंकीचे बोल जनां ।
सुखवितात जगतीं नाना ।
बोलविता परि कोण असे ? ।
मना विचारावें खासें ! ।
तुकयाची वाणी ऐशी ।
सांगुनि गेली जनतेसी ।

म्हणुनी म्हणतो कविराया ।
दंभ गर्व अपुले वाया ।
प्रभुरायाचें स्वामित्व ।
कवितेवारि, हें घ्या तत्त्व ।
अहंकृतीला सोडोनी ।
मन-दर्पण उज्वल करुनी
सत्य पहावें शुद्ध मनें ।
बुद्धी दिधलीं ईशानें ।
यंत्रापरि आपण आहों ।
चालक अमुचा प्रभुरावो ।
उदात्त जनमन बनवावें।
जनतेला शिक्षण द्यावें ।
पापाचा गंध न राहो ।
ह्या भूवरती मग हा हो ।
सत्काव्याचें हें कार्य ।
माना तेंच शिरोधार्य ।
हृदय फुटूनी ये पूर ।
श्रेष्ठ काव्य मग बनणार ।
बंधन, बेडी, त्यास नको ।
बाजारांत विको, न विको !

प्राणावांचुनि शव जेवीं ।
काव्याविण वाङ्मय तेवीं ।
थांबे इतुकें सांगोनि ।
तत्त्व, रसिक ! आणा ध्यानीं ।

---

## ५ मृत्यूस धिक्कार.

चाल—( भूपती खरे ते० )

धिक्कार असो हे मृत्यो ! आजी तुजला ।
तव भीति न वाटे निर्मल कविचित्ताला ।
मी सरस्वतीचा प्रियकर तान्हा बाळ ।
तूं यमराजाचा कृष्ण कुटिल रे लोळ ।
तव दि[illegible] पाहुनि कींव येतसे चित्तीं ।
मज नको सुखें नव, तुच्छ सकल संपत्ती ।
या काव्यसागरोदकीं घडे मज स्नान ।
मी मला विसरतां हरपे भूक तहान ।
अधिकार आमुचा मोठा आहे फार ।
शारदा देविचे आम्ही कांचनहार ।
जगताचें भूषण आम्ही कवि आहोंत ।
तव भीत्युत्पादक खेळ सकल राहोत ।
नांव हें आमुचें सदैव राहिल येथें ।

जरि न्यावें वाटे, ने तरि जड कायेतें ।
त्यायोगें बघतां मिळे न कांहीं तुजला ।
चैतन्यमिषानें व्यापिन ह्या जगताला ।
मी वसेन केव्हां प्रमदेच्या मृदु गालीं ।
निर्झरीं राहुनी करीन अथवा केली ।
रत्नांत कदां मी राहिन तेजांशानें ।
जरि न्यावें वाटे शरीर माझें हें ने ।
ह्या नभांत स्वेच्छाविहार तारकरूपें ।
मी करीन तेव्हां जळतिल तुमचीं पापें ।
वास्तव्य कवीचें स्थिरचर अवघ्या जगतीं ।
त्यापुढें दिसे नरशरीर केवळ माती
स्वेच्छेनें चाखिन प्रेमाचा मकरंद ।
म्हणुनिया सांगतों सोड आमुचा छंद ।
ईशेच्छा तिजला मान सदा त्वां द्यावा ।
कां वेड्या करिशी आम्हां कवींचा हेवा ।
प्रभु दयाघना! जगताच्या मंगल नाथा ।
‘नारायण-सुत’ तव पदीं ठेवितो माथा ।

---

४२e

## ६ वनभ्रमण.

( साक्या )

सृष्टिचें सौंदर्य बघोनी वेडी वृत्ती व्हावी ॥
इतर कल्पना सकल विराल्या, समाधिसुख ह्या जीवीं १
हिरवीं कुरणें ! छे छे ! गमतो मश्रूचा गालीचा ॥
कुणीं पसरिला नयनमनोहर धरेवरी किंमतीचा ॥ २ ॥
पक्षिराज हे प्राप्त जाहले, भाट जणूं सृष्टीचे ॥
कविरायाला गीत गाउनी दावितात देवाचें ॥ ३ ॥
दिनकर तेव्हां कोमल किरणें पाडि धरेच्यावरती ॥
अथवा प्रभुचें हास्य पसरलें, खालीं तैसें वरती ॥ ४ ॥
मौज पहाया पुढें निघालों, निर्झर झुळझुळ वाहे ॥
श्रवणमधुर रव त्याचा परिसुनी मीं स्वानंदीं पोहें ॥
गाउं लागलों सहज तदा मी आत्मानंदासाठीं ॥
ऐकियल्या गानाच्या ताना, पडे नाग मम दृष्टी ॥ ६ ॥
तो गानामें मोहित होई, फणा उचलुनी सांगे ॥
'कवे! वक्रता सोडुनि दिधली, मनशिं मित्रसम वागे ॥
कुटिल दुष्ट जे लोक जगांतिल व्यर्थ अम्हांला छळिती
दंश करुनिया सूड तयांचा घ्यावा ही शुभ नीति ८॥
कवी तुझ्यासम प्रभुरायाचे प्रेषित गमती मातें ॥
सुखाविलें त्वां मम हृदयाला, दाविलेंस प्रेमातें' ॥९॥

मला फळे मग तत्व सुखाचें, 'जिंकी जग प्रेमानें' ॥
विसरति अपुली कठिण कुटिलता सर्पादिक नियमानें ॥
असा असे नर कचित जगीं जो अपकारानें लोकीं ॥
उपकाराचा मोबदला दे, सोडुनि अपुली नेकी ॥११
पर्वत दिसला एक त्यावरी लागे कीं चढण्यास ॥
मुनिवर जगता फंटाळुनिया करिती जेथें वास ॥१२॥
एकाचें मज घडलें दर्शन, बोध तयानें दिधला ॥
सारांशानें कथीन म्हणतों, प्रियकर रसिक जनाला ॥
"वत्सा तुजला बोध हिताचा कथितों तो परिसावा ॥
करी जगीं उपकार, तयास्तव त्रास सकल सोसावा१४
लोक दाविती व्यर्थ विरक्ती, खरें नसे तें सारें ।
स्वार्थबुद्धिनें मांडितात कीं दंभाचेचि पसारे ॥ १५ ॥
अशा जनांचे नादीं लागुनि लाभ काय होईल? ।
सन्मार्गापासुनी दूर तव आयु सर्व जाईल ॥ १६ ॥
शाब्दिक बडबड दिसेल अवघड वेदांताची तुजला ।
कळतां अंतीं, म्हणशिल भोंदू घात कराया सजला१७
ईशभक्ति ही ह्यांची खोटी, फसवायाचा कावा ।
विचारवंतानें ह्या झोकीं कशास तो ऐकावा? ॥ १८ ॥
पुण्य खरें उपकार दुजावरि, पाप दुःख दुसऱ्यातें ।
ऐसें मोठे संत सांगती करुणेनें जगतातें ॥ १९ ॥

संसारी राहणें नरानें, कमल जसें कासारीं ।
संन्यासास्तव केली प्रभुनें सृष्टि काय ही सारी? ॥२०॥
रहा सुखानें तुष्ट मनानें संसारीं हे वत्सा! ।
अभिमानानें करूं नको रे इतर जनांची कुत्सा ॥२१॥
गृहस्थाश्रमीं विपुल संधि तुज, खरा लाभ साधावा ।
कायावाचामनें करोनी कारि देवाचा धांवा ॥ २२ ॥
सत्य वदावें नित्य तुवां तरि ईश तुष्ट हो त्यानें ।
लोकहितास्तव सांगितलें हें वचन पहा ज्ञात्यानें ॥ २३
समाधान हें खरें सौख्य बघ, त्याविण राजा रंक ।
तें नाहीं तरि दुःखपूर्ण जग मानावें निःशंक ॥२४॥
निवृत्तीचा मार्ग बिकट बहु, थोड्यांना साधेल ।
सामान्यानें स्वीकारीतां उलट तया बाधेल ॥ २५ ॥
आशीर्वादा मी देतों रे, काव्यशक्ति तव सारी ।
जनोपदेशीं वेचुनि तिजला, रहा तुष्ट संसारीं" ॥२६॥
ऐकुनि मुनिची वाणी आले प्रेमाश्रू नयनांत ।
कल्याणास्तव संत राहती. उक्ति पटे स्वमनांत ॥ २७
साष्टांग प्रणिपात करोनी, निरोप घेई त्यांचा ॥
तुष्ट मनानें पुढें चाललों, स्तब्ध जाहली वाचा ॥ २८ ॥
शिलाखंड पाहुनिया बसलों तेव्हां मी मोदांत ॥
मनुजासाठीं सकल धरित्री प्रभुजी कीं करितात ॥ २९

चोहिंकडे मज प्रेम दिसे जें तें वर्णन करण्यास ॥
वेडा कवि, त्या शक्ती नाहीं, युक्ति नसेही खास ॥
क्षणभरि वृत्ति स्वस्थ जाहली, मत्सर दंभ विराले ॥
त्या क्षणिंचें मज स्मरणहि आतां सुखकर ऐसें झालें २१
दयालु देवें निसर्गनिर्मित दावियली ही शोभा ।
हेतू हा कीं पाहुनि विसरो मनुज स्वमनःक्षोभा ॥ २२

---

## ७ ईशस्तवन.

चाल—( ब्यँडची )

प्रार्थना असो तुला । सदय विश्वमंगला ॥
दीर्घायुर्बल तसें । भूपतीस द्या कसें ॥
हिंद-भूमिला सदा । दाखवी न आपदा ॥
शांतता जगीं वसो । कलह केधवां नसो ॥
एक आस पुरवि ही । धन्य धन्य हो मही ॥

॥ ॐ तथास्तु ॥

---

ग्रंथालय
दा. क्र. १६०७.
REFBK-0001697
REFBK-0001697

# विक्रीस तयार.

रा. रा. विश्वनाथ नारायण वाड
यांनीं केलेलीं पुस्तकें—
काव्यकुसुमोद्यान गुच्छ १ ते ३,
किंमत व्ही. पी. नें ८ आणे.
श्रीसयाजीचरित ( काव्य )
किंमत अर्धा आणा.
विचारतरंग! ( उपदेशपर नीतिबोधवचनें )
किंमत एक आणा.

मिळण्याचा पत्ता:—ए. आर. बैसास, पेंटर.
नं० ७६५ बैसास वाडा, अदितवार पेठ,
नासिक.